# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई (म्हाडा)

## गिरणी कामगारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि.३१/०७/२०१७ पर्यत मुदतवाढ देण्याबाबत

**"ज्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना सन २०१० -२०११ मधील मोहिमेच्या अनुषंगाने अर्ज करता आले नाहीत, केवळ अशाच गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना"** म्हाडाचे संकेतस्थळ https://millworker.mhada.gov.in वरुन ऑनलाईन अर्ज दि.२६/०५/२०१७ ते दि.२७/०६/२०१७ पर्यत सादर करण्यासाठी जाहिरात दि.२५/०५/२०१७ रोजीच्या वर्तमानपत्रात व म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि, गिरणी कामगारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विविध स्तरावरुन विनंती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ज्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना वरील मुदतीत ऑनलाईन अर्ज करता आले नाहीत, केवळ अशयाच गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी **दि.२८/०६/२०१७ पासुन दि.३१/०७/२०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे**.

ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी अर्जदारास प्रशासकीय खर्च रु.१५०/- (Non Refundable/ ना परतावा) ऑनलाईन (Online) भरणा करणे अनिवार्य आहे. तसेच ज्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना रु.१५०/- चा भरणा ऑनलाईन पध्दतीने करणे शक्य नाही, केवळ त्यांनीच म्हाडाने नियुक्त केलेल्या **कोटक महिंद्रा बँकेच्या खालील शाखेमध्ये** बँकेच्या कार्यालयीन वेळेत **दि.३१/०७/२०१७, दुपारी ३.०० वाजेपर्यत** व्यक्तीशः उपस्थित राहुन रोख रकमेचा भरणा करुन पोच पावती प्राप्त करुन घ्यावी. कोटक महिंद्रा बँकेत गिरणी कामगारांसाठी कोणतेही अर्ज भरुन दिले जात नाहीत, याची गिरणी कामगार / वारसांनी नोंद घ्यावी.

A) **वरळी शाखा -** शॉप नं.३-१०, तळमजला, सिटी व्हयु बिल्डींग, डॉ.ॲनी बेसेंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८, दुरध्वनी क्र.०२२-६७४७४२००

B) **लालबाग शाखा -** वीर महल स.गृ.नि.संस्था, तळमजला,शॉप नं.९-१२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, मुंबई-४०००१०,दुरध्वनी क्र.०२२-६५९९१९५८-९०

C) **कलानगर, वांद्रे(पु) शाखा -** व्हॉलमार्क प्लाझा, तळमजला, गुरुनानक हॉस्पीटल जवळ, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-४०००५१, दुरध्वनी क्र.-०२२-६६०५६६१२

- सविस्तर जाहिरात - सर्व अटी / शर्ती व सूचनासह म्हाडाचे संकेतस्थळ https://millworker.mhada.gov.in वर पहावयास मिळेल.
- यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी /शर्ती जशाच्या तशा लागु राहतील.
- ऑनलाईन (Online) अर्ज सादर करण्यासाठी अंतिम दिनांक **दि.३१/०७/२०१७** पर्यत राहील (अर्ज नोंदणी **दि.३१/०७/२०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यत** सुरु राहील.)
- ऑनलाईन अर्ज करतांना नोंदणी प्रकार (Enrollment Type) मध्ये "**गिरणी कामगार**" किंवा "**कायदेशिर वारस**" बरोबर नमुद केला असल्याची खातरजमा करावी. जर मुळ गिरणी कामगार ऑनलाईन अर्ज करीत असल्यास नोंदणी प्रकारामध्ये "**गिरणी कामगार**" नमुद करावे. मुळ गिरणी कामगार मयत असल्यामुळे जर त्यांचे वारसांपैकी कोणताही एक वारस ऑनलाईन अर्ज सादर करीत असल्यास नोंदणी प्रकारामध्ये "**कायदेशिर वारस**" नमुद करावे.
- मुळ गिरणी कामगार हयात (जिवंत) असल्यास मुळ गिरणी कामगारांनीच ऑनलाईन अर्ज करावा, वारसांनी ऑनलाईन अर्ज करु नये.
- मुळ गिरणी कामगार मयत असल्यास गिरणी कामगारांच्या वारसांपैकी फक्त एका वारसांने ऑनलाईन अर्ज सादर करावा.

➢ फोटो अपलोड करण्यापूर्वी म्हाडाच्या संकेतस्थळावर दिलेली फोटो हेल्प फाईल बघावी व त्यानुसार फोटोची साईज ३०० K.B पर्यंत असल्याची खातरजमा करुनच अपलोड करावा.

**टिप :- सदरचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार अथवा एजंन्ट म्हणुन नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**


**अधिक माहितीसाठी संपर्क**

"म्हाडा लॉटरी केंद्र "

मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५ जवळ, गृहनिर्माण भवन

वांद्रे (पु), मुंबई-५१

हेल्प लाईन नं.- ९८६९९८८०००

(०२२-२६५९८९२१ ते २४)

०२२-२६५९२६९२/९३

म्हाडा संकेतस्थळ-https://millworker.mhada.gov.in

https://mhada.maharashtra.gov.in

म्हाडा हेल्पलाईन ई मेल - dycoeastmb@mhada.gov.in


**(सुभाष लाखे)**

मुख्य अधिकारी

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,

मुंबई